ePaper

# अजित पवारांना लांडग्याचं पिल्लू म्हणणं पडळकरांना भोवणार?



| वर्ष - 7 । अंक - 157 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- ऑस्ट्रेलियाचा लाजिरवाणा पराभव!
- २० वर्षांनी अक्षय -रवीनासोबत
- कुपोषणात भारत आघाडीवर!
- रांगा लागल्या तर वाहने सोडून द्या!



www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 13 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पुनवळे कचरा डेपोचा चेंडू मुख्यमंत्र्यांच्या कोर्टात!

## » खासदार बारणे यांचा पाठपुरावा : आरक्षण स्थलांतराचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुनावळे येथील प्रस्तावित कचरा डेपोचे आरक्षण स्थलांतर करण्याबाबत प्रस्ताव सादर करावा, असे आदेश राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यामुळे पुनावळे, मारुंजी, जांबे आणि नेरेतील नागरिकांना दिलासा मिळाला आहे. प्रस्तावित कचरा डेपो स्थलांतर करण्याबबात मावळ लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सकारात्मक पुढाकार घेतला असून, त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्रव्यवहार केला. त्याची तात्काळ दखल घेत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**



श्रीरंग आप्पा बारणे
खासदार, लोक सभा
मावळ मतदार संघ · पुणे-रायगड
SHRIRANG APPA BARNE
MEMBER OF PARLIAMENT - LOK SABHA
MAVAL CONSTITUENCY - PUNE - RAIGAD

MEMBER :
- Standing Committee on Housing and Urban Affairs
- Consultative Committee for the Ministry of Culture and Tourism
- Parliamentary Committee on Official Language

प्रति,
मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई-३२

विषय : पुनावळेतील कचरा डेपो आरक्षण स्थलांतर करणेबाबत.

आपला
श्रीरंग आप्पा बारणे
खासदार

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील पुनावळे येथे कचरा डेपो आरक्षण मंजूर करण्यात आले. पुनावळे गावाचा १९९९ मध्ये महापालिका हद्दीत समावेश झाला. अद्याप या गावातील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम झालेल्या नाहीत. विकास आरखड्यानुसार, या गावातील वन विभागातील जागेत कचरा डेपोचे आरक्षण आहे. सदर जागेत असंख्य हरित क्षेत्र आहे. सभोवताली मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प निर्माण झाले असून, महाराष्ट्रासह देशाच्या कानाकोपऱ्यातून या भागात नागरिक वास्तव्यास आहेत. गेल्या काही दिवसांपासून पुनावळेत कचरा डेपो सुरू करण्याबाबत हालचाली सुरू आहेत. त्यामुळे या भागातील सुमारे ३० हजार नागरिक चिंतेत आहेत. सदरचा कचरा डेपोमुळे कचऱ्याच्या लिचेडमुळे भूजप्रदूषण होणार असून, रावेत बंधाऱ्यातील पाणीसाठासुद्धा प्रदूषित होण्याची भिती आहे. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन महिन्यांपूर्वी पिंपरी-चिंचवड महापालिकेत विविध विकासकामांबाबत आढावा बैठक घेतली होती. त्यावेळी पुनावळे कचरा डेपोसाठी पर्यायी जागेचा शोध घ्यावा, असे आदेश प्रशासनाला दिले होते. आता राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरक्षण स्थलांतरचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिल्यामुळे कचरा डेपो स्थालांतरीत होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



“ कचरा डेपो ही शहराची गरज आहे. त्यामुळे पुनावळेतील कचरा डेपो रद्द करा अशी मागणी व्यवहार्य नाही. परंतु, लोकहित व या भागातील नागरिकांची भूमिका लक्षात घेता सदर कचरा डेपोचे आरक्षण पर्यायी जागेत करावे, अशी स्थानिक नागरिकांसह आमची मागणी आहे. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले आहेत.

– **श्रीरंग बारणे,** खासदार, मावळ लोकसभा.

# सोसायटीधारकांच्या समस्या निवारणासाठी सहविचार सभा

## » चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचा पुढाकार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन मार्फत रविवारी (दि. 15) सकाळी साडे दहा वाजता सहविचार सभेचे आयोजन केले आहे. सर्व सोसायटी धारकांसाठी विविध अडचणी आणि येणाऱ्या समस्या सोडविण्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. पूर्णानगर येथील सेक्टर 17 मधील महापालिकेच्या बहुउद्देशीय सभागृहात हा कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे.**

शहरातील सोसायटीधारकांना दैनंदिन विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महापालिका प्रशासनाच्या पातळीवर हे प्रश्न रखडले जात आहेत. त्याला सकारात्मक गती दिली जात नाही. यावर तोडगा काढण्यासाठी विचारविनिमय करण्यासाठी फेडरेशनच्या वतीने ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा केली जाणार आहे. यामध्ये फेडरेशनच्या कार्याचा आढावा व भविष्यात करावयाच्या कामाबाबत नियोजन. आदर्श उपविधीनुसार सोसायटी चालवण्याबाबत सखोल मार्गदर्शन. बिल्डरकडून सोसायटी हस्तांतरण करून घेत असताना करावयाच्या




प्रक्रियेची माहिती दिली जाणार आहे. तसेच सोसायटी बिल्डरकडून हस्तांतरण करून घेताना घ्यावयाची विविध कागदपत्रे तसेच याबाबत येणाऱ्या विविध अडचणी बाबत मार्गदर्शन व मदत करणे. बिल्डरकडून सोसायटीची अपूर्ण असणारी कामे, विविध समस्या, बिल्डरकडून होणाऱ्या त्रासाबाबत मार्गदर्शन आणि मदत करणे. सोसायटीच्या निवडणूक प्रक्रियेची माहिती देणे. सोसायटीच्या देखभाल खर्चाबाबत आणि तो वसूल करण्याबाच्या प्रक्रियेबाबत चर्चा केली जाणार आहे. तसेच अभीहस्तांतरण ( कन्व्हेन्स डीड ) आणि मानीव अभीहस्तांतरण ( डिम्ड कन्व्हेन्स) बाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. या सह थकीत मेंटेनन्स वसुली बाबतची पूर्ण प्रक्रियेची माहिती दिली जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

“ पिंपरी-चिंचवड शहरातील बऱ्याच गृहनिर्माण संस्थांमध्ये आदर्श उपविधीनुसार सोसायट्या संचलित करत असताना अनेक अडचणी येतात. तसेच शहरातील अनेक सोसायट्यांमधे बांधकाम व्यावसायिकांकडून गृहप्रकल्पाचे काम करत असताना अनेक नियमबाह्य कामे केली जातात. या अडचणी व समस्या सोसायटीधारकांना आहेत. याबाबत या सभेमध्ये मार्गदर्शन व प्रत्यक्ष मदत केली जाणार आहे.

– **संजीवन सांगळे,**
अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशन

# शिरूर लोकसभेसाठी भाजपाचा उमेदवार कोण ?

## » खासदार अमोल कोल्हे हे पुन्हा निवडणूक लढवणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिरूर लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपाचा उमेदवार कोण असणार याची उत्सुकता सर्वांनाच लागलेली आहे. कारण त्या ठिकाणी राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून विद्यमान खासदार अमोल कोल्हे हे पुन्हा निवडणूक लढवणार असण्याची शक्यता आहे. शिरूर लोकसभा मतदार संघात भाजपाचा उमेदवार हा महेश लांडगे असावा अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे.**



महेश लांडगे हे अत्यंत कष्टाळू आणि उत्कृष्ट नेते आहेत. असं कौतुक प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केल आहे. परंतु, महेश लांडगे हे शिरूर लोकसभा लढवणार की नाही. यावर बोलताना आमचं केंद्रीय नेतृत्व आणि राज्यातील महायुतीचे प्रमुख नेते उमेदवार ठरवणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आमदार महेश लांडगे यांना शिरूर लोकसभेसाठी सध्यातरी वेट अँड वॉच ची भूमिका घ्यावी लागणार आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शिरूर लोकसभेचा खासदार सर्वात जास्त मतांनी निवडून येईल तसा प्रतिसाद शिरूर लोकसभा मतदारसंघात मिळत आहे. महा विजयाचा ४५ चा आकडा आम्ही पूर्ण करू असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. यावेळी अमोल कोल्हे यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना बावनकुळे म्हणाले, आमच्यावर टीका करणाऱ्यांनी जनतेला खऱ्या अर्थाने फसवला आहे.

माझ्यावर अमोल कोल्हे यांनी टीका केली आहे, त्यांना ती टीका लखलाभ. पुढे ते म्हणाले, मराठा बांधवांनी मला काळे झेंडे दाखवले. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला संपूर्ण आरक्षण दिल गेलं. मराठा आरक्षणाचे खरे शिल्पकार हे देवेंद्र फडणवीस आणि चंद्रकांत पाटील आहेत. जे आरक्षण कॅबिनेटने दिले, जे आरक्षण विधिमंडळात मंजूर झालं, सुप्रीम कोर्टात देखील टिकलं ते देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे. ज्यांनी हे आरक्षण घालवलं त्यांनाच प्रश्न विचारले पाहिजेत. मला जे काळे झेंडे दाखवून काय फायदा?, मराठा समाजाच्या आरक्षणाला भाजपाच संपूर्ण समर्थन आहे. आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत. त्यामुळे काळे झेंडे दाखवून मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटणार नाही. असेही त्यांनी म्हटलं आहे.

### महेश लांडगे यांना वेट अँड वॉचची भूमिका

» महेश लांडगे हे शिरूर लोकसभा लढवणार की नाही. यावर बोलताना आमचं केंद्रीय नेतृत्व आणि राज्यातील महायुतीचे प्रमुख नेते उमेदवार ठरवणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आमदार महेश लांडगे यांना शिरूर लोकसभेसाठी सध्यातरी वेट अँड वॉचची भूमिका घ्यावी लागणार आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शिरूर लोकसभेचा खासदार सर्वात जास्त मतांनी निवडून येईल तसा प्रतिसाद शिरूर लोकसभा मतदारसंघात मिळत आहे. अमोल कोल्हे यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना बावनकुळे म्हणाले, आमच्यावर टीका करणाऱ्यांनी जनतेला खऱ्या अर्थाने फसवला आहे.

---

# बालेवाडी शॉपिंग अ‍ॅण्ड फूड फेस्टिवलमध्ये "बॉईज ४" चित्रपटाच्या कलाकारांची धम्माल!

## » शॉपिंग अ‍ॅण्ड फूडला नागरिकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद!

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लहू बालवडकर सोशल वेलफेअर तर्फे आयोजित दोन दिवसांच्या बालेवाडी शॉपिंग अ‍ॅण्ड फूड फेस्टिव्हलची उत्साहात सांगता झाली. यादरम्यान पहिल्या दिवशी बॉईज ४ या मराठी चित्रपटाच्या कलाकारांनी फेस्टिवलला भेट देत सर्वांचाच उत्साह वाढवला.**




बालेवाडीमधील दसरा चौकातील आठवडे बाजार मैदानावर या शॉपिंग अ‍ॅण्ड फूड फेस्टिव्हलचे आयोजन ७ आणि ८ ऑक्टोबर दरम्यान सकाळी अकरा ते रात्री नऊ पर्यंत केले होते. या शॉपिंग अ‍ॅण्ड फूड फेस्टिव्हलला बाणेर बालेवाडीकरांनी भरभरून प्रतिसाद दिला. शॉपिंग अ‍ॅण्ड फूड फेस्टिवलमध्ये तब्बल ६० हुन अधिक गृहपयोगी तसेच शॉपिंगच्या उत्पादनांचे स्टॉल्स या ठिकाणी उपलब्ध होते. उत्कृष्ट नियोजन असणाऱ्या या फेस्टिव्हलला बाणेर बालेवाडी परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत जोरदार खरेदी केली. या फेस्टिव्हलचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे बॉईज ४ या मराठी चित्रपटाच्या सर्वच कलाकारांनी फेस्टिवलला दिलेली भेट. या वेळी सिनेमाच्या सर्व टीमने बाणेर बालेवाडीकरांसोबत संवाद साधत धमाल केली. या मध्ये पार्थ भालेराव, अभिनय बेर्डे, प्रतीक लाड, रसिक शोत्री, रितूजा शिंदे, जुई बेंडखळे सह दिग्दर्शक विशाल देवरुखकर, आणि निर्माता राजेंद्र शिंदे आदी उपस्थित होते. या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओंकार दीक्षित यांनी केले. या वेळी 'बॉईज 4' बद्दल दिग्दर्शक विशाल देवरुखकर म्हणाले की, "आतापर्यंत 'बॉईज'च्या तिन्ही भागांवर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केले. या तिन्ही भागांमध्ये काहीतरी सरप्राईस होते. 'बॉईज 4' मध्येही असेच सरप्राईस आहे. प्रेक्षकांचे मिळणारे प्रेम पाहूनच आम्हाला 'बॉईज 4' करण्याची प्रेरणा मिळाली. मला खात्री आहे, हा सिनेमाही प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन करेल".

### आत्मनिर्भर होण्यासाठी मदत!

» या "शॉपिंग अ‍ॅण्ड फूड फेस्टिव्हल"च्या माध्यमातून वेगवेगळ्या क्षेत्रातील स्वतःचा व्यवसाय सुरु करणाऱ्या महिला आणि व्यावसायिकांना एकत्र करत लहू बालवडकर सोशल वेल्फेअर हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना या शॉपिंग अ‍ॅण्ड फूड फेस्टिव्हलचा मोठा उपयोग होत असून त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी देखील मदत होत आहे. स्थानिक पातळीवरील उद्योगाला प्रोत्साहन देऊन त्यांना हातभार लावण्याचे काम लहू बालवडकर सोशल वेल्फेअर करत आहे.

# हिंदू संस्कृती संपवण्याची भाषा करणाऱ्यांचा बदला घ्या!

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे आवाहन



### शिरुर निवडणूक प्रमुख महेश लांडगे यांचे शक्तीप्रदर्शन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाच्या सीमा सुरक्षीत करणारे सरकार पुन्हा एकदा २०२४ मध्ये स्थापन झाले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी “महिला आरक्षण” कायदा केला. त्यामुळे लोकसभेच्या संसदेत १९१ महिला खासदार होणार आहेत. महाराष्ट्रातील विधानसभा सभागृहात १०० महिला आमदार होणार आहेत. त्यामुळे देशातील १४० कोटी लोकांना मोदीच पुन्हा प्रधानमंत्री हवे आहेत. अयोध्येत प्रभू श्रीरामचंद्रांचे राम मंदिर साकारात आहे. पण, मोदींना हारवण्यासाठी मुंबईत २८ पार्टी एकत्र आल्या. त्यातील एका पार्टीचा मुख्यमंत्री स्टॅलीनचा मुलगा उदयनिधी म्हणतो “या देशातील हिंदू संस्कृती संपवून टाकू”. याचा बदला देशातील जनता घेतल्याशिवाय रहाणार नाही. आत्मनिर्भर भारत करायचा असेल, तर मोदींना साथ द्या, असे आवाहन भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.**

भाजपातर्फे शिरुर लोकसभा मतदार संघांतर्गत ‘घर चलो अभियान’ आणि भाजपा वॉरिअर्स संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त' भव्य रॅलीचे आयोजन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक, ममता स्विट शेजारी, दत्तनगर-दिघी येथे करण्यात आले. या रॅलीला सामान्य नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, माजी मंत्री बाळा भेगडे, भाजपा प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, विक्रांत पाटील, ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष योगेश टिळेकर, निवडणूक प्रमुख महेश लांडगे, पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप, भोसरी विधानसभा निवडणूक प्रमुख विकास डोळस, संयोजक विजय फुगे, पुणे भाजपाचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्यासह पिंपरी-चिंचवडमधील पदाधिकारी, मा. नगरसेवक, मंडलप्रमुख उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज यांच्यासह ‘भारत माता की जय’ अशा जयघोषांनी दिघी परिसर दणाणून सोडला. ढोल-ताशांच्या गजरात भाजपाने शक्तीप्रदर्शन केले.




प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, आगामी २०२४ मधील मे किंवा जून महिन्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील. “कश्मिरच्या लाल चौकात मोदींनी तिरंगा फडकावला... म्हणून माझं मत मोदींना आहे..” असे १४ वर्षांचा मुलगा सांगतो. सुमारे १ हजार १३ लोकांना आम्ही भेटलो. त्यापैकी १ हजार १२ लोकांनी मोदीच पुन्हा पंतप्रधान व्हावेत, असे म्हणतात. त्यामुळे शिरुर लोकसभा मतदार संघातील ९० टक्के लोक मोदींना मतदान करतील. या मतदार संघाचा खासदार महाराष्ट्रात सर्वांत जास्त मतांनी निवडून येईल. तो खासदार पंतप्रधान म्हणून मोदींना मतदान करेल, असा ‘वादा’ करा, असे आवाहन बावनकुळे यांनी केले.

दरम्यान, ‘मेरी माटी मेरा देश’ या अभिमानातून दिल्लीत अमृत वाटिका तयार करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वत: पुढाकार घेत आहेत. त्यासाठी हातात माती घेतलेला फोटो काढावा. महाराष्ट्रातून किमान १ कोटी फोटो संकलन करण्यात येणार आहे.

या अभियानामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राजेश पांडे यांनी केले. तसेच, माजी सैनिक संघटना आणि नाभिक समाज संघटनेने भाजपाला पाठिंबा दिला.

### बावनकुळे म्हणतात... “एकच वादा.. महेशदादा...”

» शिरुर लोकसभा मतदार संघात लोकसभा प्रवास योजना आणि घर चलो अभियान सक्षमपणे राबवल्याबाबत प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवडणूक प्रमुख महेश लांडगे यांचा जाहीर सभेमध्ये “एकच वादा...महेशदादा...” असा उल्लेख करीत कौतुकाची थाप दिली. विशेष म्हणजे, येत्या २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत प्रभू श्रीराम मंदिराचे दर्शन घेण्यासाठी कोण जाणार? असा उपस्थित नागरिकांनी “एकच वादा..महेशदादा..” असा नारा दिला. त्यावर महेश लांडगेंकडे नोंदणी करुन टाका, असे आवाहन करीत बावनकुळे यांनी आमदार लांडगे यांना किती लोकांना अयोध्येला घेवून जाणार असे विचारले. त्यावर पिंपरी-चिंचवडमधून ५ हजार नागरिकांना प्रभूश्रीराम मंदिराचे दर्शनासाठी घेवून जाणार असे सांगितले. यावर बावनकुळे यांनी आमदार लांडगे यांचे अभिनंदन केले.

> “कोविड काळात संपूर्ण जग हादरले. पण, संपूर्ण देशाला मोफत लस देण्याची भूमिका घेतली. जगभरात लस पुरवठा केला. जगातील १४ देशांनी मोदींना त्यांच्या देशाचा सर्वोच्च पुरस्कार दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोत्कृष्ठ काम केले. त्यांच्या पाठित खंजीर खुपसला. उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी फडणवीस यांना थांबवले. पण, इथले इथेच फेडावे लागले. आज त्यांची परिस्थिती काय आहे? ही महाराष्ट्राची जनता पाहते आहे. मुख्यमंत्रीपद गेले, पार्टी गेली, असेच हाल शरद पवारांचे आहेत. साडेतीन जिल्ह्याचे प्रधानमंत्री बनले होते.
>
> **- चंद्रशेखर बावनकुळे,** प्रदेशाध्यक्ष, भाजपा.

# निवृत्तिवेतन योजनेचा मध्यममार्ग?




**केंद्रीय तसेच विविध राज्य सरकारी कर्मचारी संघटनांकडून जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याची मागणी केली जात आहे. आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतन योजनेचा मुद्दा तापण्याची चिन्हे रामलीला मैदानावरील प्रचंड निदर्शनांतूनही गेल्या आठवड्यात दिसली.**

निवृत्तिवेतन योजनेचा मुद्दा राजकीयदृष्ट्या तापदायक ठरू शकतो याचा अंदाज आल्यानेच केंद्रातील मोदी सरकारने नवीन निवृत्तिवेतन योजनेत कोणते बदल करता येतील याचा अभ्यास करण्याकरिता केंद्रीय वित्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. तशात, आंध्र प्रदेश सरकारने अलीकडेच हक्काची निवृत्तिवेतन योजना लागू करण्याच्या संदर्भातील विधेयक विधानसभेत मंजूर केले आणि केंद्र सरकारलाही या प्रश्नाच्या सोडवणुकीची संभाव्य दिशा दाखवून दिली. जुन्या निवृत्तिवेतनामध्ये दरमहा ठरावीक रकमेची हमी आहे आणि नव्यात ती नाही, हा मुख्य फरक. त्यामुळेच हिमाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत सरकारी कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतन योजनेचा मुद्दा राजकीय बनला आणि निकालावर त्याचा परिणाम झाला. त्या राज्यात




जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याचे आश्वासन देणाऱ्या काँग्रेसला सरकारी कर्मचाऱ्यांनी भरभरून मते दिली. कर्नाटकातही जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याच्या आश्वासनाचा लाभ काँग्रेसला मिळाला, तर महाराष्ट्रात सरकारी कर्मचाऱ्यांकडून मागणी होऊ लागताच तेव्हा अर्थ खातेही सांभाळणारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या हिवाळी अधिवेशनात जुनी निवृत्तिवेतन योजना लागू केल्यास राज्य सरकार कसे दिवाळखोरीत जाईल याची आकडेवारी जाहीर केली. त्याचा भाजपला विधान परिषदेच्या नागपूर, पुणे, मराठवाडा, अमरावती, नाशिक या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांत फटका बसला. मग महाराष्ट्रानेही हा प्रश्न समितीकडे सोपवला. केंद्रात भाजपने जुन्या निवृत्तिवेतन योजनेच्या विरोधातच भूमिका घेतली आहे. जुन्या निवृत्तिवेतन योजनेत शेवटच्या मूळ पगाराच्या (बेसिक) ५० टक्के रक्कम दरमहा निवृत्तिवेतन म्हणून मिळते. याउलट १ जानेवारी २००४ पासून लागू झालेली नवीन निवृत्तिवेतन योजना ही बाजाराशी संलग्न असल्याने शेअर बाजाराच्या चढउतारावर कर्मचाऱ्यांचे निवृत्तिवेतन अवलंबून असते. यामुळेच कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तिवेतन योजना अधिक लाभदायक वाटते. जुन्या निवृत्तिवेतन योजनेत कर्मचाऱ्यांना त्यांचा काही वाटा द्यावा लागत नाही, नवीन योजनेत मात्र दरमहा १० टक्के रक्कम जमा करावी लागते. यातूनच जुनी निवृत्तिवेतन योजना सरकारसाठी अधिक खर्चीक ठरते. राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, पंजाब आदी भाजपेतर पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांत जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यांच्या आर्थिक स्थितीवर गंभीर परिणामांचा इशारा दिला. बिगर भाजपशासित राज्यांमध्ये जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्यास सुरुवात झाल्याच्या पार्श्वभूमीवर जुन्या योजनेमुळे राज्य सरकारांची आर्थिक शिस्त बिघडेल आणि राज्ये अधिक कंगाल होतील, असा इशारा रिझर्व्ह बँकेनेही दिला आहे. वस्तू आणि सेवा कररचना लागू झाल्यापासून देशातील बहुतांशी राज्यांचे वित्तीय आरोग्य बिघडले आहेच. विकासकामांसाठी पुरेसा निधी राज्यांकडे उपलब्ध नाही. महाराष्ट्रात एकूण महसुली उत्पन्नाच्या १५ टक्के म्हणजेच ६७ हजार कोटींपेक्षा अधिक रक्कम निवृत्तिवेतनावर खर्च होते. आंध्रमधील सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर शेवटच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम निवृत्तिवेतन म्हणून मिळणार आहे. याशिवाय वर्षातून दोनदा महागाई भत्त्याची रक्कम मिळेल. मात्र यासाठी कर्मचाऱ्यांना दरमहा १० टक्के रक्कम या योजनेत जमा करावी लागेल. राज्य सरकारही तेवढाच वाटा उचलणार आहे. जुन्या निवृत्तिवेतन योजनेप्रमाणेच कर्मचाऱ्यांना अखेरच्या मूळ वेतन रकमेच्या ५० टक्के रक्कम मिळेल. याचाच अर्थ निवृत्तीपूर्वी मूळ वेतन २० हजार रुपये असल्यास कर्मचाऱ्याला १० हजार निवृत्तिवेतन मिळेल.

## संपादकीय »

### आखाती अवलक्षण!

***इस्रायलरूपी अवघड जागेच्या दुखण्याचा वेळीच इलाज न केल्यामुळे सहन होत नाही नि सांगताही येत नाही, अशी बायडेन यांची अवस्था झाली आहे.***

हमास या पॅलेस्टिनी दहशतवादी संघटनेने इस्रायलच्या अनेक भागांमध्ये केलेल्या भीषण हल्ल्यांमुळे केवळ इस्रायली पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांचीच फजिती झाली असे नव्हे. ती अमेरिकेचे पुन्हा अध्यक्षीय इच्छुक जो बायडेन यांचीही झाली.

शिवाय ती दुहेरी आहे. 'इस्रायलच्या निर्मितीनंतर अवघ्या काही तासांत त्या देशाला मान्यता देणारे आम्ही होतो,' असे अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी परवा सांगितले. त्यात तथ्य आहेच. परंतु ज्या देशाने ७५ वर्षे इस्रायलची पाठराखण केली आणि ज्याच्या संरक्षणाची जबाबदारी स्वशिरावर घेतली, त्या अमेरिकेलाही इस्रायलवरील संभाव्य हल्ल्याची कुणकुण लागू नये, ही त्यांच्याही दृष्टीने नामुष्कीच. इस्रायलला स्वसंरक्षणाचा हक्क आहे ही बाब वादातीत असल्याचे बायडेन यांनी निक्षून सांगितले.

**दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्कवरील दावा मागे घेतला याचा अर्थ शिंदे गटाने लढतीपूर्वीच मैदान सोडले असा काढण्याची काहीही गरज नाही. सणासुदीच्या काळात तरी राजकारण नको हाच उदात्त हेतू यामागे आहे. त्यामुळे ही उपरती कशी काय झाली असा प्रश्न उपस्थित करण्याची आवश्यकताच नाही. ठाकरे गटाने या मैदानासाठी जूनमध्येच अर्ज करून ठेवला, सत्तेच्या कैफात धुंद असलेल्या शिंदे गटाला आधी अर्ज करण्याचे सुचले नाही असा तर्कसुद्धा नको.**

## सारे काही सहिष्णुतेसाठी..

वाद न्यायालयात गेला तर पुन्हा तोंडावर आपटावे लागेल या भीतीने माघार घेतली यातही तथ्य नाही. गेल्या वर्षी हा वाद वाढत गेला, त्यामुळे राज्यातील जनतेची उत्कंठा शिगेला पोहोचली व लोक दोन्हीकडच्या गर्दीची तुलना करू लागले. त्यात ठाकरेंनी बाजी मारल्याचे चित्र निर्माण झाले. यंदा हे टाळावे म्हणून माघार घेतली हा युक्तिवादसुद्धा बिनबुडाचा ठरेल. गेल्या वर्षी ठाकरेंच्या तुलनेत शिंदेंचे भाषण खूप रटाळ झाले, त्यांना प्रतिटोमणेसुद्धा बरोबर मारता आले नाहीत. राज्यभर बसेस पाठवून गर्दी गोळा करावी लागली, तीही कमीच भरली, त्यामुळे यंदा वाद उभा राहण्याआधीच अंग काढून घेतले हा दावासुद्धा चुकीच्या गृहीतकावर आधारलेला. आता एक पाऊल मागे घेतले, उद्या दोन पावले पुन्हा मागे येतील व दोन्ही गटात मनोमीलनाचा मार्ग लवकरच मोकळा होईल असा भाबडा आशावाद व्यक्त करण्याची



तर गरजच नाही. गेल्यावर्षी हा वाद वाढवत नेला पण सहानुभूती ठाकरे गटाला मिळाली म्हणून यावेळी काढता पाय घेतला हे विधानसुद्धा तद्दन खोटे! या माघारीमुळे मातोश्रीला सळो की पळो करून सोडायचे या दिल्लीश्वरांनी दिलेल्या एककलमी कार्यक्रमात खंड पडला असा निष्कर्ष कुणी काढूच नये. लढाईत एक पाऊल मागे घेतले म्हणजे पराभवाची चाहूल लागली, असे तर्कटही मांडूच नये.

शिवाजी पार्क व ठाकरेंचा दसरा मेळावा हे समीकरण पुढेही कायम राहील असे भाकीत वर्तवण्याची सुद्धा घाई नको. गेल्या वर्षी न्यायालयीन लढाईत बराच वेळ गेला त्यामुळे बीकेसीवर पूर्ण क्षमतेने तयारी करता आली नाही, यंदा ही कसर भरून काढण्यासाठी तोंडी लागणे टाळले हा युक्तिवादही चुकीचा. सत्तेच्या बळावर कुणालाही नमवता येते, विरोधकांना जेरीस आणता येते असे सार्वत्रिक वातावरण असताना अचानक नांगी टाकण्याचे कारण काय हा प्रश्नही पूर्णपणे गैरलागू. या माघारीचे खरे कारण शिंदेंच्या उदार अंत:करणात दडले असून त्याची वाच्यता ते क्रॉस मैदानावरील मेळाव्यात करतीलच. महाराष्ट्राच्या मंगलभूमीत सहिष्णुता वाढीला लागावी, शिंदे हेच सहिष्णू राजकारणाचे जनक अशी त्यांची प्रतिमा निर्माण व्हावी व त्याचा फायदा त्यांना भावी काळात व्हावा हाच हेतू या माघारीमागे आहे. कायम तलवार उपसून युद्धाच्या आवेशात वावरणाऱ्या ठाकरे गटाला हा अर्थ कळत नसेल, जिंकल्याचा जल्लोष ते आतापासून करत असतील तर राहू द्या त्यांना त्या खुमखुमीत. घोडा मैदान शिंदे गटच मारेल हे मात्र लक्षात ठेवा!

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# टोलनाक्यावर वाहनांच्या रांगा लागल्या तर वाहने सोडून द्या!

## अतिरिक्त मनुष्यबळ नेमण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पथकर नाक्यांवर वाहनांच्या रांगा लागू नये यासाठी आवश्यक मनुष्यबळाची संख्या वाढवावी. स्वच्छतागृहासह रुग्णवाहिका, प्रथमोपचार सुविधा उपलब्ध करून द्यावी. मुंबई एन्ट्री पॉईंटच्या टोल नाक्यांवर व्हिडिओ चित्रीकरण करण्यात यावे, पथकर मार्गावरील पुलांचे, उड्डाणपुलांचे, भुयारी रस्त्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले.**



सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने यासंदर्भात मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यावेळी झालेल्या बैठकी दरम्यान मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागाला निर्देश दिले. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे, आमदार प्रमोद पाटील, माजी आमदार बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, अमित ठाकरे, संदीप देशपांडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शिष्टमंडळासमवेत आलेल्या मुलुंड, ठाणे येथील गृहनिर्माण संस्थांमध्ये राहणाऱ्या रहिवाशांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे टोल वाढ आणि टोल नाक्यांवरील गर्दी, सोयी सुविधा याबाबत समस्या मांडल्या. यावेळी टोल बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कराराप्रमाणे टोल नाक्यांवर कंत्राटदाराने आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजे. त्यामध्ये स्वच्छता गृहे, रुग्णवाहिका, प्रथमोपचार सुविधा, क्रेन याबाबी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. स्वच्छतागृहांची स्वच्छता सतत राखली पाहिजे. मंत्री भुसे, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार यांनी शिष्टमंडळातील प्रतिनिधींना सोबत घेऊन उद्यापासून टोल नाक्यांवरील सुविधांची पाहणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. टोल नाक्यांवर पिवळ्या पट्टीपर्यंत वाहनांची रांग लागणार नाही याची दक्षता कंत्राटदाराने घेतली पाहिजे. वाहनांच्या रांगा लागल्या तर तसेच वाहने सोडून दिली पाहिजे. यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ नेमण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. मुंबई परिसरातील पाचही टोलनाक्यांवर येणाऱ्या आणि जाणाऱ्या वाहनांची संख्या मोजण्यासाठी व्हिडीओग्राफी करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. पुढील १५ दिवस हे चित्रीकरण करावे असेही त्यांनी सांगितले. टोल मार्गावरील जे उड्डाणपुल, पुल, भुयारी मार्ग आहेत त्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. मुंबई हद्दीतील मुलुंड येथील हरिओम नगर वसाहतीतल रहिवाशांना टोल नाक्यावरून मुंबई जावे लागू नये यासाठी नवघर पोलिस ठाण्याजवळील नाल्यावर तातडीने पुल करण्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### सुविधांची पाहणी करावी !

» कराराप्रमाणे टोल नाक्यांवर कंत्राटदाराने आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजे. त्यामध्ये स्वच्छता गृहे, रुग्णवाहिका, प्रथमोपचार सुविधा, क्रेन याबाबी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. स्वच्छतागृहांची स्वच्छता सतत राखली पाहिजे. मंत्री भुसे, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार यांनी शिष्टमंडळातील प्रतिनिधींना सोबत घेऊन उद्यापासून टोल नाक्यांवरील सुविधांची पाहणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. टोल नाक्यांवर पिवळ्या पट्टीपर्यंत वाहनांची रांग लागणार नाही याची दक्षता कंत्राटदाराने घेतली पाहिजे. वाहनांच्या रांगा लागल्या तर तसेच वाहने सोडून दिली पाहिजे.

# समूह शाळा योजनामुळे शाळांचं वाटोळं होणार!

## मराठवाड्यातील 25 पेक्षा अधिक शिक्षक, शिक्षकेतर संघटना एकत्र

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्य सरकारच्या 'शाळा दत्तक योजना', 'शाळा समूह योजना' धोरणांमुळे सरकारी शाळांचे वाटोळं होणार आहे. सरकारी शाळांवाले आज जात्यात तर आपण सुपात आहोत. आता सगळ्यांनी बलिदान करण्याची वेळ आली, अशा भावना व्यक्त करत मराठवाड्यातील २५ पेक्षा अधिक शिक्षक, शिक्षकेतर संघटना एकत्र आल्या आहेत.**

'शैक्षणिक व्यासपीठ' भरवित संघटनांनी राज्य सरकारसोबत संघर्ष करण्याचा निर्णय घेतला आहे. आता सगळ्यांनी बलिदान करण्याची वेळ आली.. सरकार धोरण रद्द करत नाही, तोपर्यंत लढा देण्याचा निर्णय संघटनांनी गुरुवारी बैठकीत घेतला. राज्य शासनाने सरकारी शाळांसाठी 'दत्तक शाळा योजना', 'शाळा समूह योजना', सरकारी नोकऱ्यांचे कंत्राटीकरण अशी धोरणे जाहीर केली अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर संघटना, संस्थाचालक संघटना निर्णयाविरोधात एकत्रित आल्या आहेत. 'दत्तक शाळा योजना', 'शाळा समूह योजना' अद्यादेशातून शिक्षण क्षेत्र मोडीत काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे काहींनी मांडले. यावेळी शिक्षण संस्था महामंडळ, शिक्षकेतर महासंघ, मुख्याध्यापक संघ, शिक्षक क्रांती, शिक्षक सेना, मुप्टा, मराठवाडा शिक्षक संघ, राष्ट्रवादी शिक्षक संघटना, मेसा, कायम विनाअनुदान शाळा कृती समिती, स्वाभिमानी शिक्षक व शिक्षकेतर संघटना, अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटना, दलीत पँथर शिक्षक संघटना, शिक्षक समिती, शिक्षक संघ, शिक्षक संघ शिवाजीराव पाटील गट, डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षक संघटना, कास्ट्राईब शिक्षक संघटना, उर्दू शिक्षक संघटना, म.रा. अशासकीय व्होकेशन शिक्षकेतर कर्मचारी संघटना अशा विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



### सरकारविरुद्ध लढा देण्याचा निर्णय

» छत्रपती संभाजीमध्ये गुरुवारी अशा २५ पेक्षा अधिक संघटनांचे प्रमुख, पदाधिकारी एकत्रित आले. वसंतराव नाईक महाविद्यालयात झालेल्या पहिल्या बैठकीत संघटनांनी धोरणाबाबत नाराजी व्यक्त केली. एकत्रित येत संघटना विविध टप्प्यात निर्णयांविरोधात रस्त्यावर उतरणार आहेत. यामध्ये शाळा बंद, धरणे, उपोषण करण्यावर निर्णय झाला. आज सरकारी शाळा जात्यात आहेत, आपण सुपात आहोत. या धोरणांमुळे शिक्षण क्षेत्रात अगणित बदल होतील, अनेकांनी यावेळी तीवृ शब्दात निर्णयाचा विरोध करत एकत्र लढा देण्याचा निर्णय घेतला.

# इस्रायल-हमास युद्धापासून दूर राहा!

## » जो बायडेन यांचा इराणच्या भूमिकेवरून संताप

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**इस्रायल आणि पॅलेस्टईनमध्ये सुरू असलेल्या युद्धाकडे संपूर्ण जगाचं लक्ष आहे. पॅलेस्टाईनमधली दहशतवादी संघटना हमासने शनिवारी (७ ऑक्टोबर) इस्रायलवर हजारो क्षेपणास्त्रं डागून युद्धाला सुरवात केली. बेसावध असलेल्या इस्रायलसाठी हा मोठा धक्का होता. या हल्ल्यात आतापर्यंत शेकडो इस्रायली नागरिक ठार झाले आहेत. तसेच हमासच्या दहशतवाद्यांनी इस्रायलमध्ये घुसखोरी करून १५० हून अधिक इस्रायली महिलांचं अपहरण केलं आहे.**

हमासच्या हल्ल्यानंतर इस्रायली सैन्याने गाझा पट्टीवर हल्ला चढवला, तसेच इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी युद्धाची घोषणा केली. पाच दिवसांपासून सुरू असलेल्या या युद्धात आतापर्यंत २,००० हून अधिक लोक मारले गेले आहेत. दरम्यान, जगभरातल्या अनेक देशांनी इस्रायल किंवा पॅलेस्टाईनला पाठिंबा दर्शवला आहे. यापैकी अमेरिका इस्रायलच्या बाजूने उभी आहे. तर लेबनान आणि इराणमधून पॅलेस्टाईनला, हमासला मदत मिळत असल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे अमेरिकेचे अधक्ष जो बायडेन यांनी इराणच्या भूमिकेवरून संताप व्यक्त केला. तसेच बायडेन यांनी इराणला हमास-इस्रायल वादात पडू नका असा इशारा दिला आहे. दुसऱ्या बाजूला ही युद्ध परिस्थिती हाताळण्यासाठी इस्रायलने मोठा निर्णय घेतला आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू आणि विरोधी पक्षनेते बेनी गँट्झ यांनी हमासच्या दहशतवाद्यांविरोधात लढण्यासाठी आपत्कालीन युद्ध सरकार स्थापन केलं आहे. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री अँटनी ब्लिंकन इस्रायलला जाणार आहेत. तर अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी बुधवारी ज्यू नेत्यांची एक बैठक बोलावली होती. या बैठकीत बायडेन म्हणाले, आम्ही इस्रायलच्या दिशेने पाठवलेली आमची विमानं आणि युद्धनौका हा इराणसाठी संदेश आहे. कारण ते हमास आणि हिजबुल्लाहचं (लेबनानमधील दहशतवादी संघटना) समर्थन करतात.

### हमासचा हा एक क्रूर हल्ला : बायडेन

» इस्रायल आणि पॅलेस्टईनमध्ये सुरू असलेल्या युद्धाकडे संपूर्ण जगाचं लक्ष आहे. हमासने शनिवारी (७ ऑक्टोबर) इस्रायलवर हजारो क्षेपणास्त्रं डागून युद्धाला सुरवात केली. बेसावध असलेल्या इस्रायलसाठी हा मोठा धक्का होता. या हल्ल्यात आतापर्यंत शेकडो इस्रायली नागरिक ठार झाले आहेत. बायडेन म्हणाले, हमासचा हा एक क्रूर हल्ला होता. तो दिवस (हल्ला झाला तो दिवस – ७ ऑक्टोबर) ज्यू समुदायासाठी काळा दिवस होता. आम्ही इस्रायली संरक्षण दलांना अतिरिक्त लष्करी सहाय्य पुरवत आहोत. तसेच या सैन्य तुकड्यांमध्ये वाढ केली जाईल. अमेरिका इस्रायलला दारू-गोळा पुरवत आहे. आम्ही पूर्व भूमध्य समुद्रात सैन्य आणि शस्त्रास्त्र वाहून नेणारी जहाजं तैनात करत आहोत. तसेच तिथे लढाऊ विमानं पाठवत आहोत.

# कुपोषणात भारत आघाडीवर!

## » ग्लोबल हंगर इंडेक्समध्ये भारत 111 व्या स्थानावर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आज ग्लोबल हंगर इंडेक्स (GLOBAL HUNGER INDEX) जारी करण्यात आला आहे. यामध्ये भारताची 111 व्या स्थानावर घसरण झाली आहे. भारताचा स्कोअर हा 28.7 टक्के आहे. यावेळी भारताची पाकिस्तानसह बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंकेनं बगल काढली आहे. ग्लोबल हंगर इंडेक्सनुसार भारतात भूक आणि उपासमारीची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे.**



ग्लोबल हंगर इंडेक्स 2023 मध्ये भारताची स्थिती बिकट झाली आहे. 125 देशांच्या ग्लोबल हंगर इंडेक्समध्ये भारत 111 व्या स्थानावर आला आहे. इतकेच नाही तर सर्वाधिक बालकांच्या मृत्यूचे प्रमाण तसेच बालकांच्या कुपोषणातही भारत आघाडीवर आहे. 2022 सालापासून भारताची स्थिती आणखी बिकट झाली आहे. गेल्या वर्षी भारत या निर्देशांकात 107 व्या क्रमांकावर होता. यावर्षी त्यामध्ये आणखी घसरण झाली असून, भारताची 111 व्या स्थानावर घसरण झाली आहे. इंडेक्समध्ये भारताचा स्कोअर 28.7 टक्के आहे. यानुसार भारतात भूक आणि उपासमारीची परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे समोर आले आहे. ग्लोबल हंगर इंडेक्स हे जागतिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावर भूकेचे सर्वसमावेशक मोजमाप आणि मागोवा घेण्यासाठी एक साधन आहे. भारताच्या शेजारी असणाऱ्या इतर देशांवर नजर टाकली तर पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका आणि नेपाळचीही स्थिती चांगली आहे. 2023 मध्ये पाकिस्तान 102 व्या, बांगलादेश 81 व्या, नेपाळ 69 व्या आणि श्रीलंका 60 व्या क्रमांकावर आहे. केंद्र सरकारच्या महिला आणि बालविकास मंत्रालयाने गेल्या वर्षी आणि त्याआधीच्या वर्षी म्हणजे सलग दोन वर्षे हा ग्लोबल हंगर इंडेक्स अहवाल पूर्णपणे नाकारला होता. मंत्रालयानं सांगितलेल्या माहितीनुसार, जागतिक भूक मोजण्यासाठी केवळ मुलांवर लक्ष केंद्रित केलेल्या मेट्रिक्सचा वापर केला जाऊ नये. मंत्रालयाने याला भूक मोजण्याचा चुकीचा मार्ग म्हटले होते. GHI 2022 बद्दल, मंत्रालयाने असेही म्हटले आहे की भूक मोजण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 4 पद्धतींपैकी 3 फक्त मुलांच्या आरोग्यावर आधारित आहेत.

### इंडेक्समध्ये भारताचा स्कोर खूपच कमी

» ग्लोबल हंगर इंडेक्स 2023 मध्ये भारताची स्थिती बिकट झाली आहे. 125 देशांच्या ग्लोबल हंगर इंडेक्समध्ये भारत 111 व्या स्थानावर आला आहे. इतकेच नाही तर सर्वाधिक बालकांच्या मृत्यूचे प्रमाण तसेच बालकांच्या कुपोषणातही भारत आघाडीवर आहे. भारताची स्थिती आणखी बिकट झाली आहे. गेल्या वर्षी भारत या निर्देशांकात 107 व्या क्रमांकावर होता. यावर्षी त्यामध्ये आणखी घसरण झाली असून, भारताची 111 व्या स्थानावर घसरण झाली आहे.

# 5 हजार वर्षांपासून भारत धर्मनिरपेक्ष!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज


राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (RSS) प्रमुख मोहन भागवत यांनी बुधवारी धर्मनिरपेक्षतेबाबत मोठं विधान केलं. भारत हा पाच हजार वर्षांपासून धर्मनिरपेक्ष देश आहे. भारताने लोकांमधील एकजूट आणि मानवी वर्तनाचं सर्वोत्तम उदाहरण जगासमोर ठेवलं, असं वक्तव्य मोहन भागवत यांनी केलं.

ते आरएसएसचे ज्येष्ठ स्वयंसेवक रंगा हरी यांनी लिहिलेल्या 'PRITHVI SOOKTA – AN ODE TO MOTHER EARTH' या पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात बोलत होते. "लोकांनी आपल्या मातृभूमीसाठी भक्ती, प्रेम आणि समर्पण ठेवावं.

आम्ही मातृभूमीला आपल्या राष्ट्रीय एकात्मतेचा एक महत्त्वाचा घटक मानतो. आपली पाच हजार वर्षे जुनी संस्कृती धर्मनिरपेक्ष आहे. हाच निष्कर्ष सर्व तत्वज्ञानामधून निघतो. संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे, हीच आपली भावना आहे. हा केवळ सिद्धांत नाही, हे आधी लक्षात घ्या आणि मग त्यानुसार वर्तन करा," असंही आरएसएसचे प्रमुख मोहन भागवत म्हणाले. "आपल्या देशात खूप विविधता आहे. एकमेकांशी भांडू नका. आम्ही सर्वजण एक आहोत, हा संदेश जगाला देण्यासाठी आपल्या देशाला सक्षम बनवा. हाच भारताच्या अस्तित्वाचा एकमेव उद्देश आहे," असंही ते म्हणाले. जगाच्या कल्याणासाठी द्रष्ट्यांनी भारत निर्माण केला.

त्यांनी एक समाज तयार केला, ज्यांनी त्यांचं ज्ञान देशातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवलं. ते फक्त संन्यासी नव्हते. ते आपल्या कुटुंबासह भटक्यांचे जीवन जगत होते. हे सर्व 'घुमंतू' (भटके) आजही इथे आहेत, ज्यांना इंग्रजांनी गुन्हेगारी जमाती म्हणून घोषित केलं होतं. ते बऱ्याचदा समाजात आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवतात. तर काहीजण आयुर्वेदिक ज्ञान देतात," असंही मोहन भागवत यांनी पुढे नमूद केलं.

# 'गणपथ' मधील 'जय गणेशा' पाहून अंगावर येईल काटा!



बॉलीवूडचा प्रसिद्ध अभिनेता टायगर श्रॉफ हा त्याच्या हटके स्टाईल आणि धाडसी ॲक्शन सीन्ससाठी ओळखला जाणारा अभिनेता आहे. आजवर बॉलीवूडमधील सर्वाधिक चर्चेतील ॲक्शन हिरोंमध्ये त्याचे नाव घेतले जाते. सध्या त्याचा गणपथ नावाचा चित्रपट चर्चेत आला असून त्या चित्रपटातील पहिले गाणे प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. काही दिवसांपूर्वी गणपथचा टीझर व्हायरल झाला होता. त्यात बिग बी अमिताभ बच्चन यांचा हटके लूक आणि टायगरची जबरदस्त ॲक्शन पाहून चाहते भारावून गेले होते. आता त्याच चित्रपटातील जय गणेशा गाण्यानं चाहत्यांना प्रतिक्रिया देण्यास भाग पाडले आहे. टीझरला मिळालेल्या उदंड प्रतिसादानंतर, चित्रपटाच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या रोमांचक ट्रेलरने चाहत्यांना आणि प्रेक्षकांना वेगळ्याच उंचीवर नेले आहे. चित्रपटातील 'जय गणेश' हे भव्य उत्सवी गाणे सोशल मीडियावर ट्रेंडिंगचा विषय आहे. काही दिवसांपूर्वीच निर्मात्यांनी पहिले गाणे 'हम आये हैं' लाँच केले होते जे रिलीज झाल्यापासून सर्व प्लॅटफॉर्मवर चर्चेचा विषय आहे. चित्रपटाचा संगीतमय प्रवास सुरू ठेवत निर्मात्यांनी बहुप्रतिक्षित 'जय गणेश' गाणे रिलीज केले आहे. जय गणेश हे गाणे विशाल मिश्रा यांनी गायले असून संगीतकार अक्षय त्रिपाठी यांनी गीतं लिहिली आहेत. पूजा एंटरटेनमेंट गुड कंपनीच्या सहकार्याने प्रस्तुत 'गणपत: अ हिरो इज बॉर्न' ज्याचे दिग्दर्शन विकास बहल यांनी केले आहे. वाशू भगनानी, जॅकी भगनानी, दीपशिखा देशमुख आणि विकास बहल यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. हा चित्रपट 20 ऑक्टोबर 2023 रोजी हिंदी, तमिळ, तेलुगू, मल्याळम आणि कन्नड भाषेत जगभरात रिलीज होणार आहे.

## 'मी एकटी', 'शॉर्ट ॲण्ड स्वीट'चं गाणं रिलीज

'शॉर्ट ॲण्ड स्वीट' या चित्रपटातील 'मी एकटी' हे गोड गाणे प्रदर्शित झाले आहे. सोनाली कुलकर्णी आणि श्रीधर वत्सर यांच्यावर चित्रित करण्यात आलेले हे सुरेख गाणे आनंदी जोशीने गायले असून या रोमँटिक गाण्याचे बोल मंगेश कांगणे यांचे आहेत. या संतोष मुळेकर यांनी या गाण्याला संगीतबद्ध केले आहे. या गाण्यात सोनाली कुलकर्णी श्रीधर वत्सर यांची आतुरतेने वाट पाहताना दिसत आहे. त्यांच्यातील हे गोड नाते, निरागस प्रेम खूपच सुंदर आहे. गाण्याचे बोलही तितकेच मधुर आहेत. साथीदाराला भेटण्याची ओढ या गाण्यातून व्यक्त होत आहे. या गाण्याबद्दल दिग्दर्शक गणेश कदम म्हणतात, आज या चित्रपटातील दुसरे गाणे संगीतप्रेमींच्या भेटीला आले आहे. नवरा बायकोच्या एकत्र बसून गप्पा मारणे, जेवण बनवणे, घरातल्या छोट्या छोट्या गोष्टी एकत्र करण्यातली एक गंमत, भावनिक क्षण या गाण्यात दाखवण्यात आले आहेत. यातूनच खरं प्रेम बहरते. मंगेश कांगणे यांचे बोल आणि संतोष मुळेकर यांचे संगीत आणि त्याला लाभलेला आनंदी जोशीचा आवाज हे समीकरण खूप मस्त आहे. शुभम प्रोडक्शन प्रस्तुत पायल गणेश कदम, विनोद राव निर्मित आणि गणेश दिनकर कदम दिग्दर्शित या चित्रपटात सोनाली कुलकर्णी, श्रीधर वत्सर यांच्यासह या चित्रपटात हर्षद अतकरी, रसिका सुनील यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपट येत्या ३ नोव्हेंबर रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.



## 20 वर्षांनी अक्षय करतोय रवीनासोबत काम

बॉलिवूड सेलिब्रिटींची लव्ह लाइफ, त्यांचे अफेअर हा कायमच चर्चेचा विषय राहिला आहे. काही कलाकार त्यांच्या बॉलिवूडमधील करिअरपेक्षा अफेअर्समुळे प्रसिद्धीझोतात आले होते. बॉलिवूडमध्ये गाजलेल्या अफेअर्सपैकी एक म्हणजे अक्षय कुमार आणि रवीना टंडन यांचं अफेअर. अक्षय-रवीना ही ९०च्या काळातील बॉलिवूडमधील हिट जोडी होती. १९९६ साली प्रदर्शित झालेल्या 'मोहरा' चित्रपटात त्यांनी पहिल्यांदाच एकत्र स्क्रीन शेअर केली होती. त्यानंतर 'खिलाडियो का खिलाडी', 'मे खिलाडी तू अनारी', 'पोलीस फोर्स', 'किमत', 'बारुद' अशा अनेक चित्रपटांत त्यांनी एकत्र काम केलं. पण, त्यानंतर जवळपास २० वर्ष ते एकत्र काम करताना दिसले नाहीत. आता 'वेलकम ३'च्या निमित्ताने ते पुन्हा एकत्र दिसणार आहेत. २० वर्षांनंतर रवीना टंडनबरोबर काम करण्यावर अक्षय कुमारने भाष्य केलं आहे. 'एएनआय'ला दिलेल्या मुलाखतीत खिलाडी कुमार म्हणाला, "वेलकम टू द जंगल या चित्रपटात आम्ही एकत्र काम करत आहोत. लवकरच या चित्रपटाचं शूटिंग सुरू होणार आहे. आम्ही दोघांनी अनेक चित्रपटांत एकत्र काम केलं आहे. ते चित्रपट सुपरहिटही झाले. आता अनेक वर्षांनंतर आम्ही पुन्हा स्क्रीनवर एकत्र दिसणार आहोत. अक्षय कुमारबरोबर काम करण्यावर रवीनानेही मौन सोडलं होतं. "आमच्या दोघांची जोडी हिट होती. मोहरानंतरही आम्ही अनेक चित्रपट हिट झाले. आम्ही बोलतो आणि कधीकधी भेटतोदेखील. सगळेच त्यांच्या आयुष्यात पुढे गेले आहेत. आजच्या काळात तर मुली कॉलेजमध्ये बॉयफ्रेंडही बदलतात. घटस्फोटही होत आहेत.

## उमेश - प्रियाने स्काय डायव्हिंगचा भन्नाट अनुभव शेअर केला



प्रिया बापट हे मराठी मनोरंजन विश्वातील चर्चेतील कपल. प्रिया - उमेश सोशल मीडियावर कमालीचे सक्रीय असतात. प्रिया - उमेश यांनी नुकतंच ऑस्ट्रेलियाला आजवर कधीही न घेतलेल्या गोष्टीचा भन्नाट अनुभव घेतला. उमेशने सोशल मीडियावर या अनुभवाचा भन्नाट व्हिडीओ शेअर करत सर्वांसोबत ही माहिती शेअर केली. याशिवाय हा अनुभव घेताना त्याची झालेली मानसिक अवस्थाही त्याने सांगितली आहे. उमेश - प्रियाने सोशल मीडियावर स्काय डायव्हिंगचा भन्नाट अनुभव शेअर केला. स्काय डायव्हिंगचा व्हिडीओ शेअर करत उमेश लिहितो, "मला आयुष्यात कधी वाटलं नव्हत मी कधी SKYDIVE करण्याचा विचार सुद्धा करू शकेन. मला उंचीची भयंकर भिती वाटते, HEIGHT FOBIA म्हणतात ते काय ते. साध्या इमारतीच्या गच्चीवरून खाली बघितलं तरी हातपाय गळून जातात. म्हणूनच आयुष्यात एकच काय तो TRECK केला आणि शपथ घेतली परत कधीही TREKKING च्या वगैरे भानगडीत पडायचं नाही." उमेश पुढे सांगतो, "आमचा AUSTRALIA दौरा ठरला तेव्हा 4 दिवस TRIP EXTEND करायचं ठरवलं. पण PLANNING करायला फारसा वेळ नाही मिळाला. तरी SKYDIVE हा विचार दूर दूर पर्यन्त नव्हता, पाण्याची भिती नसल्याने SCUBA DIVE करायचं मी आणि प्रियाने ठरवलं. पण वेळेच्या अभावामुळे QUEENSLAND ला जाउन SCUBA करणं अवघड दिसायला लागलं. आणि अचानक एक दिवस कळलं आशुतोष ने AUSTRALIA दौऱ्यावर SKYDIVE च BOOKING केलय.प्रिया EXCITE झाली तिने ठरवलं ती पण करणार आणि तिने मला विचारलं तू पण कर ना. तेव्हा BOOKING साठी सगळे पैसे भरायचे नव्हते,आणि मी

# ऑस्ट्रेलियाचा लाजिरवाणा पराभव!

## दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाला 134 धावांनी हरवले

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**पाच वेळच्या विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाला सलग दुसऱ्या पराभवाचा सामना करावा लागला आहे. दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाचा 134 धावांनी दारुण पराभव केला. दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या 312 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ फक्त 177 धावांपर्यंत मजल मारु शकला. मार्नस लाबुशेन याने एकाकी झुंज दिली. पण आघाडीच्या एकाही फलंदाजाला 30 धावसंख्याही ओलांडता आली नाही.**




### लाबूशेनची एकाकी झुंज

आघाडीचे फलंदाज एकापाठोपाठ एक तंबूत परत जात होते, त्यावेळी दुसऱ्या बाजूला लाबुशेन याने चिवट फलंदाजी केली. लाबुशेन याने 74 चेंडूमध्ये 46 धावांचे योगदान दिले. लाबूशेन याने मिचेल स्टार्क याला साथीला घेत ऑस्ट्रेलियाची लाज वाचवली. लाबुशेन आणि स्टार्क यांच्या 69 धावांच्या भागिदारीमुळेच ऑस्ट्रेलियाचा संघ 100 धावसंख्या पार करु शकला. मिचेल स्टार्क याने 51 चेंडूमध्ये तीन षटकारांच्या मदतीने 27 धावांची खेळी केली. स्टार्क बाद झाल्यानंतर लाबुशेनही तंबूत परतला. स्टार्कला जानसन याने तर लाबुशेन याला केशव महाराज याने बाद केले. अखेरीस पॅट कमिन्स याने संघर्ष करण्याचा प्रयत्न केला. कमिन्स याने अखेरीस चार चौकारांच्या मदतीने 22 धावांची खेळी करत संघाची लाज राखली. ऑस्ट्रेलियाचा संघ 177 धावांत तंबूत परतला.

दक्षिण आफ्रिकेच्या भेदक माऱ्यापुढे कांगारुंनी लोटांगण घातले. कगिसो रबाडा याने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या. दक्षिण आफ्रिकेचा हा स्पर्धेतील सलग दुसरा विजय होय. या विजयासह दक्षिण आफ्रिका संघ गुणतालिकेत पहिल्या क्रमांकावर विराजमान झालाय. दक्षिण आफ्रिकेच्या माऱ्यापुढे ऑस्ट्रेलिया फलंदाज ढेर झाले. ऑस्ट्रेलियाची आघाडीची फळी कोलमडली होती. ऑस्ट्रेलियाच्या आघाडीच्या सहा फलंदाजांना 70 धावांमध्ये आफ्रिकन गोलंदाजांनी तंबूत धाडले होते. डेविड वॉर्नर, मिचेल मार्श, स्टिव्ह स्मिथ, जोश इंग्लिश, ग्लेन मॅक्सवेल आणि मार्कस स्टॉयनिस यांना मोठी खेळी करता आली नाही. सर्वजण एकापाठोपाठ एक तंबूत परतले. मिचेल मार्श सात धावा काढून तंबूत परतला. त्यानंतर डेविड वॉर्नर फक्त 13 धावा करु शकला. स्मिथ 19 धावांचे योगदान देऊन बाद झाला. जोश इंग्लिश याला 5 धावांवर रबाडाने तंबूत पाठवले. मॅक्सवेल 17 चेंडूमध्ये फक्त तीन धावा करु शकला. स्टॉयनिस पाच धावांवर बाद झाला... 17.2 षटकांत ऑस्ट्रेलियाचे सहा फलंदाज तंबूत परतले होते. आघाडीचे फलंदाज एकापाठोपाठ एक तंबूत परत जात होते, त्यावेळी दुसऱ्या बाजूला लाबुशेन याने चिवट फलंदाजी केली. लाबुशेन याने 74 चेंडूमध्ये 46 धावांचे योगदान दिले. लाबूशेन याने मिचेल स्टार्क याला साथीला घेत ऑस्ट्रेलियाची लाज वाचवली. लाबुशेन आणि स्टार्क यांच्या 69 धावांच्या भागिदारीमुळेच ऑस्ट्रेलियाचा संघ 100 धावसंख्या पार करु शकला. मिचेल स्टार्क याने 51 चेंडूमध्ये तीन षटकारांच्या मदतीने 27 धावांची खेळी केली. स्टार्क बाद झाल्यानंतर लाबुशेनही तंबूत परतला. स्टार्कला जानसन याने तर लाबुशेन याला केशव महाराज याने बाद केले. अखेरीस पॅट कमिन्स याने संघर्ष करण्याचा प्रयत्न केला. कमिन्स याने अखेरीस चार चौकारांच्या मदतीने 22 धावांची खेळी करत संघाची लाज राखली. ऑस्ट्रेलियाचा संघ 177 धावांत तंबूत परतला.

प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेने निर्धारित 50 षटकात 7 विकेटच्या मोबदल्यात 311 धावांचा डोंगर उभरला. दक्षिण आफ्रिकेसाठी सलामीवीर क्विंटन डी कॉकने 106 चेंडूत 109 धावांची खेळी केली. एडन मार्करामने 44 चेंडूत 56 धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्क आणि ग्लेन मॅक्सवेल यांनी प्रत्येकी 2-2 विकेट घेतल्या.

# बाबरच्या फलंदाजीवर अख्तर निराश!

## भारताविरोधातील सामन्याआधी खडसावले

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विश्वचषकात पाकिस्तानचा संघाने लागोपाठ दोन सामने जिंकले आहे. नेदरलँड आणि श्रीलंकेचा पराभव करत पाकिस्तान संघाने दमदार सुरुवात केली आहे. पण बाबर आझम याला अद्याप मोठी कामगिरी करता आली नाही. बाबरला 30 धावासंख्याही ओलांडता आली नाही. त्यावरुन पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज शोएब अख्तर याने आझम याला खडसावले आहे.**




### गोलंदाजांचा केला बचाव

शोएब अख्तरने पाकिस्तानी गोलंदाजांचा बचाव केला. तो म्हणाला की, मी पाकिस्तानी गोलंदाजांवर टीका करणार नाही, त्यांच्यासोबत आहे. ते लवकरच जोरदार कमबॅक करतील. सध्या आमचे गोलंदाज वनडे फॉरमॅटमध्ये गोलंदाजी करण्यास योग्य नाहीत. वनडे फॉरमॅटमध्ये 10 षटकांची गोलंदाजी हा वेगळा अनुभव असतो.

दरम्यान, पाकिस्तान संघाने श्रीलंकेने दिलेले 345 धावांचे आव्हान यशस्वी पार केले. अब्दुल्लाह शफीक आणि मोहम्मद रिझवान यांच्या शतकी खेळीच्या बळावर पाकिस्तान संघाने विराट आव्हानाचा यशस्वी पाठलाग केला. पण या सामन्यात बाबर आझम स्वस्तात माघारी परतला. श्रीलंकाविरोधात बाबर आझम फक्त दहा धावा काढून बाद झाला. त्याआधी नेदरलँडविरोधात त्याला फक्त पाच धावा काढता आल्या होत्या. त्यामुळेच सध्या बाबर आझम याच्यावर टीका होत आहे. शोएब अख्तर यानेही निशाणा साधला आहे. पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज शोएब अख्तरने बाबर आझमच्या फॉर्मवर बोट ठेवले आहे.

शोएब अख्तर म्हणाला की बाबर आझम पुन्हा एकदा फ्लॉप ठरला. पण आम्हाला बाबर आझमसारखा दुसरा खेळाडू मिळाला आहे. शोएब अख्तर म्हणाला की, बाबर आझमप्रमाणेच आम्हाला अब्दुल्ला शफीक सापडला आहे. बाबर आझम हा महान खेळाडू आहे. पण मोठ्या सामन्यांमध्ये तुम्हाला धावा कराव्याच लागतात. आगामी सामन्यांमध्ये बाबर आझम नक्कीच पुनरागमन करेल, असेही तो म्हणाला. बाबर आझम दोन सामन्यात फ्लॉप गेला, पण तो मोठा खेळाडू आहे. पुढील सामन्यात तो नक्कीच मोठी खेळी करेल. बाबर आझमकडून पाकिस्तानला मोठ्या अपेक्षा आहेत. त्याने आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे. भारताविरोधात तो धावा काढेल, असे शोएब अख्तर म्हणाला. विश्वचषकातील पहिल्या दोन्ही सामन्यात पाकिस्तान संघाने विजय मिळवला.

# 48 तासांत भारत-पाक थराराला होणार सुरुवात

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

भारत आणि पाकिस्तान यांच्यात विश्वचषकात होणाऱ्या सामन्याकडे सर्व क्रिकेटप्रेमीचं लक्ष लागले आहे. या सामन्याकडे भारत आणि पाकिस्तानसह (IND VS PAK) जगभरातील क्रीडा चाहत्यांच्या नजरा लागल्या आहेत. या सामन्यासाठी भारत आणि पाकिस्तान दोन्ही संघ अहमदाबादमध्ये दाखल झाले आहेत. 14 ऑक्टोबर रोजी हा सामना रंगणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर (NARENDRA MODI STADIUM) होणारा सामन्याला फक्त 48 तासांपेक्षा कमी कालावधी शिल्लक राहिला आहे. विश्वचषक विजयाच्या दावेदार असणाऱ्या दोन संघातील (IND VS PAK) लढतीकडे सर्व क्रीडा चाहत्यांच्या नजरा खिळल्या आहेत. भारत-पाकिस्तान यांच्यात होणारा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये होणार आहे. भारतीय वेळेनुसार, दुपारी दोन वाजता सामन्याला सुरुवात होईल. त्याआधी अर्धातास नाणेफेक होईल. टिव्हीवर स्टार स्पोर्ट्स चॅनलवर सामना पाहता येईल. स्टार स्पोर्ट्स 1, स्टार स्पोर्ट्स एचडी, स्टार स्पोर्ट्स हिंदी सह इतर भाषांमध्येही सामन्याचा आनंद घेता येईल. भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये होणारा महामुकाबला मोबईलवरही लाईव्ह पाहता येईल. डिझ्नी प्लस हॉटस्टार ॲपवर हा सामना मोफत पाहता येईल. त्यासाठी कोणतेही सब्सक्रिप्शन चार्ज लागणार नाही. फ्रीमध्ये या सामन्याचा आनंद घेता येईल. तुम्हाला फक्त लॉगइन करावे लागले. त्याशिवाय एबीपी माझाच्या संकेतस्थळावर सामन्यासंदर्भात सर्व माहिती वाचता येईल.